**प्रेसनोट** दि.१०/०६/२०१९

**<u>बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर</u>**

**<u>जखमीना तात्काळ हॉस्पिटल येथे ॲडमिट केले बाबत.</u>**

दि.१०/०६/२०१९ रोजी रात्रौ ०३.३० वा पोलीस नियंत्रण कक्ष येथुन श्रेयस नगर अप्पर बिबवेवाडी पुणे येथे पती पत्नीच्या भांडणात पतीने पत्निवर चाकुने वार केले असलेबाबत बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे रात्रगस्तीचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री अतुल थोरात यांना कॉल प्राप्त झाल्याने त्यांनी स्टाफसह कॉल पॉईंटवर जावुन पाहणी करता इसम नामे कुंडलीक गाडेकर यांने त्याची पत्नी नामे चित्रा गाडेकर हिचे चारित्र्यावर संशय घेवुन तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार चाकुने तीचे पोटावर, डाव्या बरगडीवर, डाव्या छातीवर, डाव्या पायाचे मांडीवर व गुडघ्यावर वार करुन गंभीर जखमी करुन त्याने स्वतः कोणतेतरी विषारी औषध प्राषाण करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने पोलीस उप निरीक्षक श्री अतुल थोरात यांनी पोलीस स्टाफसह त्यांना उपचारकामी ससुन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले असुन दोघांची प्रकृत्ती अत्यावस्थ स्थितीत आहे. सदर घटने बाबत इसम नामे कुंडलिक पांडुरंग गाडेकर याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणेस गु.र.नं.१८६/२०१९ भां.द.वि.क.३०७,३०९,३२३,५०४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद केला असुन पुढिल तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे हे करीत आहेत.